**Course Structure: 2024-25**
**MARATHI (009)**
**Class- IX**

**Time:3 Hours** **Max. Marks:80**

**प्रस्तावना -**

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाला मिळालेली ती अमूल्य अशी देणगी आहे. आत्मसंवाद व परसंवाद साधण्याचे ते एक प्रभावी साधन आहे की जे आपण लिखित किंवा मौखिक स्वरुपात व्यक्त करू शकतो.संवाद साधण्यासाठी लिहिणे, वाचणे, बोलणे, इशारे हावभाव, मूक अभिनय मुद्राभाव अशी अनेक माध्यमे आहेत, परंतु भाषा हे अतिशय प्रभावी साधन आहे.भाषा हे आपले विचार, मते, भावना आणि जाणिवा प्रगट करण्याचे एक साधन आहे, ती भाषा कोणतीही असो, मातृभाषा असो अथवा इतर भाषा असो. व्यक्तीच्या 'व्यक्त होणे' या स्थायीभावासाठी ती उपयुक्त आहे. भाषेच्या विकासाच्या अनेक पायऱ्यांपैकी आकलन, शब्दसंग्रह वाढविणे, वाक्यरचना, शब्दोच्चारण हे चार प्रमुख टप्पे आहेत.व्यक्तीच्या विकासानुसार त्याचे स्तर उंचावत जातात.

'मराठी' महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा आहे.यास्तव ती आपणास अवगत असणे गरजेचे आहे.देवगिरीच्या यादवांच्या काळात उदयास आलेल्या या भाषेत महानुभव व वारकरी संप्रदायापासून आजतागायत अनेक तत्त्ववेत्यांनी, साहित्यिकांनी ती वाढविण्याची तिचे संवर्धन करण्याची मोलाचे कार्य केले आहे. मराठी भाषेतील वाड.मयाला प्रदीर्घ परंपरा आहे. लिखित वाड.मयाबरोबरच लोक वाड.मयाचीही परंपरा आहे.

'माझा मराठाची बोलू कवतुके|परी अमृतातेही पैजेसी जिंके ऐसी अक्षरेंची रसिके मेळविन | 'अशी प्रतिज्ञा संत ज्ञानेश्वरांनी केली आणि ती तडीस नेली. 'विवेकसिंधु' हा ग्रंथ लिहिणारे आद्य कवी मुकुंदराज,'ज्ञानेश्वरी','अमृतानुभव','चांगदेव पासष्टी' असे ग्रंथ लिहिणारे श्री संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषा संपन्न केली.

'मराठी असे आमुची मायबोली' असे प्रत्येक मराठी माणसाने अभिमानाने म्हटले पाहिजे. मराठीतून बोलणे, मराठीतून पत्रव्यवहार करणे, मराठी वृत्तपत्रे व ग्रंथांचे वाचन करणे, हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठी असलेल्या या महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत.

२७ फेब्रुवारी हा ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'जागतिक मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. श्रवण कौशल्य म्हणजे ऐकणे, भाषण संभाषण कौशल्य म्हणजे बोलणे, वाचन कौशल्य म्हणजे आपल्यासमोरील मजकूर वाचणे, लेखन कौशल्य म्हणजे सुंदर सुवाच्च अक्षरात लिहिणे अशा सर्व कौशल्यांवर प्रभुत्त्व मिळवण्यासाठी मराठी भाषा शिक्षण महत्त्वाचे आहे.

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

अशा सुंदर शब्दात कवी सुरेश भट यांनी माय मराठीवर्णन केले आहे. इ.स.१९६० मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.अशा या भाषेत आपले विचार, मते, कल्पना, भावभावना समोरील व्यक्ती समोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडता याव्यात, भाषेवर प्रभुत्व हवे. भाषेचा विविध प्रकारे वापर करणे यास्तव विविध साहित्य प्रकारांचा समावेश प्रस्तुत प्रारुपात करण्यात आला आहे. या सर्व साहित्यप्रकारांतील आशय आणि भाषा यांमधील वैविध्य मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे हे लक्षात आणून

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

देईल. जीवनमूल्ये, जीवन कौशल्य विकसित होण्यासाठी या साहित्यकृतींची मदत होईलच, परंतु त्याबरोबर विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त होईल.

उद्दिष्टे :

| क्षमता क्षेत्रे | क्षमता विधान |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद ऐकून त्यांमधील सत्यता पडताळून पाहून त्याबाबत स्वत:चे मत निश्चित करता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या सूचनांनुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३. औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून आपले विचार मांडता येणे.<br>४. विविध साहित्यांतील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>६.परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तूलना करता येणे. |
| भाषण-संभाषण | १. विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२. विषयानुरूप स्वत:चे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>३. विविध उपक्रमांचे नियोजन,आयोजन करून त्यांत सक्रिय सहभाग घेतायेणे.<br>४. प्रभावी भाषण-संभाषण कौशल्याची वैशिष्ट्ये समजून घेऊन त्यांचा योग्य वापर करता येणे. |
| वाचन | १. योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्व क वाचन करून त्यांचा आस्वाद घेता येणे.<br>३. संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या इ-साहित्याचे वाचन करून आस्वाद घेता येणे.<br>४. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करून, त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे.<br>५. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना व माहिती चिकित्सकपणे वाचून पडताळून पाहता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचा, कल्पनांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची, कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह, सुभाषिते यांचा लेखनात प्रभावीपणे वापर करता येणे.<br>५. घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे लेखन करता येणे.<br>६. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे |

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

**Course Structure: 2024-25**
**Marathi (CODE-009)**

**CLASS –IX (इयत्ता – नववी)**

| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवीचे नाव |
|---|---|---|
| १ | सर्वात्मका शिव सुंदरा (प्रार्थना) (केवळ वाचनासाठी) | कुसुमाग्रज |
| २ | संतवाणी-अ.संत कृपा झाली | संत बहिणाबाई |
| ३ | बेटा मी ऐकतो आहे | व.पु.काळे |
| ४ | जी.आय.पी.रेल्वे. | प्रबोधनकार ठाकरे |
| ५ | व्यायामाचे महत्त्व | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज |
| ६ | ऑलिंपिक वर्तुळाचा गोफ | बाळ ज.पंडित |
| ७ | दिव्याच्या शोधामागचे दिव्य | डॉ.अनिल गोडबोले |
| ८ | सखू आजी | राजन गवस |
| ९ | उजाड उघडे माळरानही | ललिता गादगे |
| ११ | आभाळातल्या पाऊलवाटा | |
| १२ | पुन्हा एकदा | प्रतिमा इंगोले |
| १३ | तिफन (कविता) | विठ्ठल वाघ |
| १५ | माझे शिक्षक आणि संस्कार | शंकरराव खरात |
| १६ | शब्दांचा खेळ | हेलन केलर |
| | **स्थूल वाचन** | |
| १. | व्हेनिस | रमेश मंत्री |
| २. | विश्वकोश | |
| | **व्याकरण**<br>➢ शब्दांच्या आठ जाती<br>➢ लिंग<br>➢ वचन<br>➢ काळ<br>➢ वाक्याचे प्रकार –आज्ञार्थी, विधानार्थी, उद्गारवाचक, प्रश्नार्थक<br>➢ समानार्थी, विरुद्धार्थी शब्द<br>➢ समास-द्विगु,द्वंद्व- ३ प्रकार, अव्ययीभाव | |

- Textbook Prescribed- अक्षरभारती इयत्ता नववी

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

**Paper Pattern -(2024-25)**

The Question Paper will be divided into two sections: Scheme of Section and Weightage to content:

**विभाग-अ- गुण-४०**

| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit &<br>Description | प्रश्न प्रकार<br>Types of<br>Questions | प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण<br>Total Marks |
|---|---|---|---|
| आकलन<br>अपठित गद्य | एक अपठित गद्यांश अंदाजे (150-200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(सात पैकी पाच उत्तरे) | 1 x 5 =5 |
| अपठित गद्य | एक अपठित गद्यांश अंदाजे (150-200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(सात पैकी पाच उत्तरे) | 1 x 5 =5 |
| व्याकरण | सर्व व्याकरणावर आधारित-<br>शब्दांच्या जाती<br>काळ ओळखा व बदला-<br>वाक्याचे प्रकार- (आज्ञार्थी, विधानार्थी- २ प्रकार, उद्गारवाचक, प्रश्नार्थक)<br>समानार्थी शब्द -<br>विरुद्धार्थी शब्द -<br>लिंग - बदला -<br>वचन - बदला-<br>समास ओळखा - (द्विगू द्वंद्व - ३ प्रकार, अव्ययीभाव) | बहुपर्यायी (mcq)<br>5 पैकी 4, 4 x1 = 4<br>4 पैकी 3, 3 x 1= 3<br>4 पैकी 3, 3 x 1= 3<br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br>3 पैकी 2, 2 x 1= 2 | 1 x 20 = 20<br>(28 पैकी 20) |
| पाठ्यपुस्तक गद्य | पठित गद्यांश (अंदाजे 100-120 शब्द) त्यावर आधारित प्रश्न | बहुपर्यायी (mcq)6 पैकी 5 | 5 x 1= 5 |
| पद्य ( कविता) | पठित पद्य - (अंदाजे 8-10 ओळी) त्यावर आधारित प्रश्न | बहुपर्यायी (mcq)6 पैकी 5 | 5 x 1= 5 |

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

**विभाग - ब - 40 गुण**

| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit & Description | प्रश्न प्रकार<br>Types of Questions | प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण<br>Total Marks |
|---|---|---|---|
| साहित्य- गद्य (धडे) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (अंदाजे 40- 50 शब्दांत) | दिर्घोत्तरी 3 पैकी 1 | 1 x 3= 3 |
| पद्य (कविता) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | क) संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा | दिर्घोत्तरी 2 पैकी 1 | 1 x 3= 3 |
| स्थूलवाचन<br>Supplementary Reader | एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी 3 पैकी 2 | 2 x 1= 2 |
| लेखन | निबंध लेखन - आत्मवृत्त/ कल्पनात्मक/ वर्णनात्मक | विस्तारात्मक लेखन 3 पैकी 1 | 1 x 8= 8 |
| | मुद्द्यांवर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) | विस्तारात्मक लेखन 2 पैकी 1 | 1 x 7= 7 |
| | औपचारिक पत्र लेखन - मागणी/तक्रार (लिफाफा आवश्यक) | विस्तारात्मक लेखन 2 पैकी 1 | 1 x 5= 5 |

Internal assessment: Based on student's timely assignment submission, periodic assessment, notebook record (Question/Answers, creative writing etc.)

Homework, Class work, Periodic test, Subject Enrichment/Portfolio (Marks- 20)

Textbook Prescribed- अक्षरभारती इयत्ता दहावी

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे -४**

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in